बातम्या व
जाहिरातीसाठी
संपर्क साधा
* संपर्क *
मो. 9421505122

https://manmadthinagi.com/news

# मनमाड साप्ताहिक थिणगी

संस्थापक संपादक : स्व.प्रकाशजी गोयल    संपादक : तुषार गोयल

22k 916
हॉलमार्क सर्टीफाईड
बिनघटीचे दागिने
शुध्दता आणि विश्वास
100%
BIS Approved
Hallmarked Jewellery
कंचन ज्वेलर्स
सराफ बाजार, मनमाड
तुषार गोयल ९४२१५०५१२२
दिपक गोयल ९९६०९३१४१४

RNI Regd.No.91032/90 (Delhi)    वर्ष ३३ वे    अंक ११ वा.    वार : रविवार दि.४ डिसेंबर २०२२    पाने ४    किमत ५ रू.

## अल्पवयीन मुलाच्या खुनाचा उलगडा अवघ्या दोन तासात; मनमाड पोलिसांची कामगिरी



मनमाड : मनमाड शहरातील नेहरू भवन जवळील आदिवासी वस्ती येथे राहणारा अल्पवयीन मुलगा (वय ९ वर्षे २ महिने) हा दिनांक ३०।११।२०२२ रोजी सायंकाळी ५ वाजता खेळण्यासाठी घरातुन बाहेर गेला होता. मात्र तो रात्री ८ वाजेपर्यंतवेतो घरी परत न आल्याने त्याचे आई, वडील, आजी यांनी मनमाड शहरात व त्यांचे नातेवाईक यांचेकडे सुमारे २ तास शोध घेतला मात्र तो मिळुन न आल्याने ते रात्री १० वाजता पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी आले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन तत्परतेने मनमाड पोलीस स्टेशन येथे मुलाची आई सोनी सुनिल सोनवणे हिचे फिर्यादीवरुन अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आलाव त्याचा शोध घेणेकामी उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांचे आदेशान्वये सपोनि पी.बी.गिते यांनी तपास पथके तयार करून अपहरण झालेल्या मुलाचा शोध घेणेकामी शहरात रवाना केले. सपोनि श्री.गिते व पोलीस स्टाफ यांनी रात्री १ वाजेपावेतो अपहरण झालेला मुलगा लोकेश याचा कसोशिने शोध घेतला मात्र मुलगा मिळुन आला नाही.

दुसऱ्या दिवशी दिनांक १।१२।२०२२ रोजी सकाळपासूनच पोलीसांचा घटनास्थळ परीसरात व मनमाड शहरातील सर्व ठिकाणांवर मुलाचा शोध घेणे सुरू होते. त्यादृष्टीने उपलब्ध सर्व सिसिटिव्ही तपासणी करीत असतांना अपहरण झालेल्या मुलाचे एका संशयीत इसमासोबतचे फुटेज मिळुन आले. त्यातच दुपारी ४ वाजेचे सुमारास मनमाड रेल्वे स्टेशन जवळ पुणे रेल्वे लाईन लगत एका बालकाचा मृतहेद मिळुन आल्याची

(पान २ वर)

## मनमाड एफसीआय मधुन तत्काल धान्य पुरवठा करा केंद्रीय मंत्री भारती पवार यांच्या अधिकाऱ्यांना सूचना



नाशिक : देशातील शेवटच्या घटका पर्यंत गोरगरीब जनतेला धान्य मिळावे यासाठी केंद्रीय यंत्रणा काम करीत आहे. मात्र नाशिक जिल्हा सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि भारतीय अन्न महामंडळ यांच्यात सुसुत्रता नसल्याने धान्य वितरणास विलंब होत आहे, किंबहुना लाभार्थ्यांना रेशनिंग धान्यापासून वंचित राहवे लागत आहे, संबंधित विभागाने तातडीने धान्य वितरणाचे सुक्ष्म नियोजन करावे आणि या योजनेचा लाभ गरीब कुटुंबांना मिळावा अशी सक्त सूचना केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ .भारतीताई पवार यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

भारतीय अन्न महामंडळाचे राज्य सल्लागार सदस्य सिध्देश्वर बापु शिंदे, यांनी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ.भारतीताई पवार यांची भेट घेऊन भारतीय अन्न महामंडळ आणि सार्वजनिक वितरण व्यवस्था नाशिक यांचा ढिसाळ कारभारामुळे गरीब वंचित आदिवासी लाभार्थ्यां पर्यंत सुरळीत धान्य पुरवठा होत नसल्याचे निदर्शनास आणुन दिले. भारतीय अन्न महामंडळा कडुन धान्य पुरवठा वेळेवर होत नसल्या कारणाने नाशिक जिल्ह्यातील बहुतेक ठिकाणी महिना अखेर पर्यंत धान्य पोहचत नाही , नाशिक जिल्ह्याला साधारण ४१ हजार मेट्रिक टन धान्य लागते. त्यापैकी २१ हजार मेट्रिक टन धान्य हे प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनांतर्गत (PMGKY) आहे, तर २० हजार मेट्रिक टन धान्य हे राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतंर्गत आहे. परंतु केंद्रीय व्यवस्था आणि नाशिक जिल्हा धान्य वितरण व्यवस्था यांच्यात सुसुत्रता नसल्याने त्याचा फटका हा

(पान २ वर)

## वेटलिफ्टिंग स्पर्धेत केआरटीच्या साईराज परदेशीस सुवर्णपदक



मनमाड : रावेर येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय युध ज्युनियर व सिनियर वेटलिफ्टींग स्पर्धेत मनमाड येथील कवी रविंद्रनाथ टागोर इंग्लिश मिडीयम स्कूलच्या साईराज राजेश परदेशी या विद्यार्थ्याने सहभागी होवून अतिशय उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले तर ज्युनियर स्पर्धेत रौप्यपदक मिळविले. तसेच साईराज राजेश परदेशी याने रावेर येथे झालेल्या वेटलिफ्टींग स्पर्धेत क्लिन व जर्क या प्रकारात १४० किलो वजन उचलले व स्नॅच या प्रकारात ११४ किलो वजन उचलले.

साईराज राजेश परदेशी या विद्यार्थ्याच्या स्पृहणीय यशाबद्दल शाळेचे प्राचार्य मुकेश मिसर, प्राथमिकचे मुख्याध्यापक दिपक व्यवहारे, संस्थेचे वैभव कुलकर्णी, धनंजय निंभोरकर आणि संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच शाळेचे सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. साईराज राजेश परदेशी हा विद्यार्थी जय भवानी व्यायामशाळेत सराव करीत असून त्यास मुख्य प्रशिक्षक म्हणून प्रविण व्यवहारे सर व के. आर. टी. हायस्कूलचे क्रीडाशिक्षक श्री. विशाल झाल्टे सर यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

## प्रभाग क्रमांक सात व नऊ मधील होम मिनिस्टर खेळ पैठणीचा सन्मान स्त्री शक्तीचा कार्यक्रमास उदंड प्रतिसाद





मनमाड : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे करंजवण मनमाड पाणी पुरवठा योजनेच्या स्वागतार्ह मनमाड शहरात सुरू असलेला आनंदोत्सवातील शनिवारी तिसरा कार्यक्रम प्रभाग क्रमांक ७ व ९ अंतर्गत माऊली रोड विनोद भाऊ ललवाणी यांच्या निवासस्थाना जवळील चौकात संपन्न झाला. आजचा होम मिनिस्टर कार्यक्रम अतिशय उत्साहात साजरा झाला.

या कार्यक्रमास प्रभागातील महिलांनी तुडुंब गर्दी केली होती, यात गृहिणी, बाल गोपाल तसेच वयोवृध्द मातांनी आवर्जून उपस्थिती नोंदवली तसेच कार्यक्रमात हिरीरीने सहभाग घेत या कार्यक्रमाचा आनंद लुटला. या प्रसंगी आमदार सुहास आण्णा कांदे यांनी करंजवण पाणी योजना कशी असणार आहे, पाणी कसे येणार आहे यावर सविस्तर माहिती असलेली चित्रफित उपस्थित महिलांना दाखवली. विशेष म्हणजे या योजनेचे भूमिपूजन लवकरच मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेबांच्या हस्ते होणार असून या पुढे मनमाडकर माता भगिंनिसाठी २ बस उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. ज्यात आपणास करंजवण मनमाड पाणी योजनेचे काम कसे

(पान २ वर)

## आनंद बोथरा उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित



मनमाड : मनमाड शहरातील युवा व्यापारी, साईलिला क्रिएशनचे संचालक आनंद बोथरा यांना भारतीय लहूजी सेनेच्या वतीने दिला जाणाऱ्या राज्यस्तरीय उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

क्रांतीगुरू लहूजी वस्ताद साळवे यांच्या २२८ व्या जयंती निमित्त अहमदनगर जिल्हातील श्रीरामपूर येथे संपन्न झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात शाल, श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन सदर पुरस्कार आनंद बोथरा यांना प्रदान करण्यात आला. यावेळी महंत नारायणगिरीजी महाराज, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज ह.भ.प.प्रतिभाताई जाधव, भारतीय लहूजी सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब बागुल, राष्ट्रीय सचिव हनिफभाई पठाण, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक के.के.आव्हाड, कायदेशीर सल्लागार रमेश कोळेकर, हर्शल रूणवाल, मनमाड येथील समाधान त्रिभुवन, संतोष साळवे आदी उपस्थित होते.

# मनमाड शहरातील पोलीस संख्याबळ वाढविण्याची भाजपाची मागणी



मनमाड : गुरूवार दि.१ डिसेंबर रोजी मनमाड शहरात माणुसकीला काळिमा फसणारी घटना घडली. मनमाड शहर नेहरू भवन एकलव्य नगर येथील आदिवासी बालक कुमार लोकेश सुनील सोनवणे वय (९) हा लहान बालक बुधवारी दुपारी बेपत्ता झाला होता. त्याचे गुरूवारी निर्घृणपणे हत्या करून रेल्वे रूळावर तुकडे करून फेकून देण्यात आल्याचे उघड झाले. या निरागस लहान बालकाची क्रूर निर्घृण हत्या करणाऱ्या खुनी नराधमास पोलीसांनी अटक केली आहे. पण या हत्ये मागील षडयंत्राची सखोल चौकशी करावी आणि पीडित बालकाच्या कुटूंबियाना न्याय मिळून द्यावा तसेच मनमाड शहरच्या लोकसंख्येच्या तुलनेत मनमाड शहर पोलीस स्थानकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची संख्या त्वरित वाढवावी तसेच मनमाड शहरातील मध्यवर्ती ठिकाणी अपूर्ण बांधकाम अवस्थेत असलेल्या सावित्रीबाई फुले भाजी मार्केट हा अवैध कारवायाचा मोठा अड्डा झाला असून तेथे त्वरित कार्यवाही करावी, अश्या विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन मनमाड सर्कल कार्यालयात तलाठी जोपूळे यांना देण्यात आले.

या गंभीर घटनेची भाजपा नेत्या आणि केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ.भारती पवार यांनी त्वरित दखल घेतली असून पोलीस प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत कठोर कार्यवाहीच्या सूचना दिल्या आहेत. या मागणी निवेदनवर भाजपा नाशिक जिल्हा उपाध्यक्ष नितीन पांडे, भाजपा मनमाड शहर अध्यक्ष जयकुमार फुलवाणी भाजपा माथाडी कामगार सेल जिल्हा अध्यक्ष नारायण पवार भाजपा नाशिक जिल्हा अल्पसंख्यांक मोर्चा जिल्हा अध्यक्ष जलील अन्सारी भाजपा व्यापारी आघाडी जिल्हा सरचिटणीस सचिन लुनावत व्यापारी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष सचिन संघवी भाजपा आर्थिक सेल जिल्हा जिल्हा अध्यक्ष कांतीलाल लुनावत जिल्हा कार्य सदस्य उमाकांत राय, नीलकंठ त्रिभुवन,भाजपा भटके विमुक्त मोर्चा जिल्हा सरचिटणीस अकबर शाह, भाजपा शहर सरचिटणीस एकनाथ बोडखे, नितीन अहिरराव,दिपक गोयल भाजपा मनमाड शहर महिला मोर्चा अध्यक्ष सौ.सोनीताई पवार, सौ जयश्री कुंभार भाजपा दिव्यांग आघाडी सरचिटणीस बुऱ्हाण शेख, भाजपा व्यापारी आघाडी शहर अध्यक्ष अमित गोगड, भाजपा शहर उपाध्यक्ष अमित सोनवणे, बुधन बाबा शेख, मुतुझा रस्सीवाला भाजपा शिक्षक सेल शहर अध्यक्ष द्वारकानाथ झांबरे,भाजपा शहर कोषाध्यक्ष आनंद काकडे भाजपा ट्रान्सपोर्ट आघाडी चे शहर अध्यक्ष संजय चोपडा भाजपा ओबीसी आघाडी चे शहर अध्यक्ष गोविंद सानप भाजपा सहकार आघाडी चे शहर अध्यक्ष किरण उगलमूगले, भाजपा शहर सचिव मयूर माळी, सुमेर मिसर,राजेंद्र भाबड,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमोद मूळे, अनंता भामरे, प्रमोद जाधव, आकाश बोरसे, संतोष पगारे, सुरेश बोरसे, लखन साळवे, रोशन पठाण, राजू हॅन्डी अंकल यांच्या स्वाक्षरी आहेत. यावेळी वरील भाजपा पदाधिकारी यांच्यासह भाजपा कार्यकर्ते हितचिंतक व नागरिक मोठया संख्येने उपास्थित होत. निवेदनच्या प्रति उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आणि केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्य मंत्री सौ.डॉ भारतीताई प्रवीण पवार यांना पाठविण्यात आल्या. संयोजन भाजपा मनमाड शहर अध्यक्ष जयकुमार फुलवाणी, जलील अन्सारी यांनी केले. या प्रसंगी लोकेश सोनवणेला न्याय मिळावा म्हणून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली तसेच मृत लोकेश सोनवणे यास मनमाड शहर भाजपा तर्फे सामूहिक श्रद्धांजली अर्पण वाहण्यात आली.

✻ पान १ वरून ✻

## अल्पवयीन मुलाच्या खुनाचा उलगडा अवघ्या दोन तासात - मनमाड पोलिसांची कामगिरी

माहिती मिळून आल्याने उपविभागीय पेलीस अधिकारी समीरसिंग साळवे, सपोनि प्रल्हाद गिते व पोलीस स्टाफ यांनी लागलीच घटनास्थळी जावून खात्री केली असता सदर मृतदेह हा अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलाचा असल्याचे निष्पन्न झाले व तेथील परिस्थितीनुसार सदर बालकाचा खुन झाल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार तात्काळ मालेगांव अपर पोलीस अधिक्षक अनिकेत भारती यांना कळविले असता ते घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे डॉग स्कॉड, फिंगरप्रिन्ट व फॉरेन्सिक एक्सपर्ट यांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले. मिळून आलेल्या सिसिटिव्ही फुटेज मध्ये अपहरण झालेला अल्पवयीन मुलगा ज्या व्यक्तीसोबत जातांना दिसत होता त्याचा शोध घेणेकामी तात्काळ पथके तयार करून रवाना करण्यात आले व सदर इसमास अवघ्या दोन तासात पकडून त्यास ताब्यात घेण्यात आले. सदर इसमास विचारपुस केली असता त्याने त्याचे नांव सोन्या उर्फ राहुल उत्तम पवार वय १९ वर्ष राहणार नेहरूभवन आदिवासी वस्ती मनमाड असे असल्याचे सांगितले व तो अपहरण व मयत झालेला बालक लोकेश सोनवणे याचे घराजवळ राहात असल्याचे निष्पन्न झाले. सदर युवकाकडे चौकशी केली असता सदर युवकाने त्याच्या लैंगिक भावना जागृत झाल्याने त्याने अनैसर्गिक संभोग करण्याचे उद्देशाने अल्पवयीन बालकाचे अपहरण करून त्यास रेल्वे बंधारा येथे आंघोळ करण्याचे बहाण्याने घेवून जावून त्याचेसोबत दोन वेळा अनैसर्गिक कृत्य केले. मात्र मुलगा रडू लागल्याने व तो घरी जावुन घडलेला प्रकार सांगून देईल या भितीने त्याने अल्पवयीन मुलाचे डोक्यात दगडाने मारून व त्याचा उजवा हात हेक्सा ब्लेडने कापुन त्याचा निर्घून खुन केला असल्याचे सांगितले. पोलिसांनी अवघ्या दोन तासात आरोपीचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले असून आरोपीने गुन्ह्याची कबुली दिलेली आहे. सदर गुन्ह्याचा तपास नाशिक ग्रामीण पोलीस अधिक्षक शहाजी उमाप, मालेगांव अपर पोलीस अधिक्षक अनिकेत भारती, उपविभागीय पोलीस अधिकारी समिरसिंह साळवे यांचे मार्गदर्शनाखाली मनमाड शहर पोलीस स्टेशनचे सपोनि पी.बी.गिते, पोउपनि श्री.सरोवर, पोहवा सुनिल पवार, पोहवा संदिप वणवे, पोना गणेश नरोटे, पोना मुदस्सर शेख, पोशि गौरव गांगुर्डे, पोशि रणजित चव्हाण, पोशि राजेन्द्र खैरनार, पोशि संदिप झाल्टे, चालक मुरलीधर बुवा, चंदु मांजरे यांनी केला आहे.

## मनमाड एफसीआय मधून तत्काळ धान्य पुरवठा करा ना. पवार

लाभार्थ्यांना बसत असल्याचे समितीचे सदस्य यांनी मंत्रीमहोदय यांच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी मंत्री भारती पवार यांनी पुरवठा विभागा कडुन धान्य वितरण व्यवस्थेचा संपूर्ण आढावा घेतला असून धान्य पुरवठा आणि वितरण या दोन्ही यंत्रणेत सुसुत्रता आणून लवकरात लवकर दोन्ही विभागाने सुक्ष्म नियोजन करण्याचे आदेश दिले. तसेच केंद्रीय भंडार निगम (CWC) मध्ये गेली ३० वर्षांपासून काम करणाऱ्या माथडी कामगारांची टोळी नंबर २२ मधील साठ कामगारांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. या विषयी केंद्रीय मंत्री पीयुष गोयल यांची लवकरच भेट

## प्रभाग क्रमांक सात व नऊ येथील होम मिनिस्टर खेळ पैठणीचा सन्मान स्त्री शक्तीचा कार्यक्रमास उदंड प्रतिसाद

सुरू आहे हे थेट तिथे जाऊन दाखवले जाणार असून यात आपला चहा नाश्ता व प्रवासखर्च आण्णा स्वखर्चातून देणार आहेत, अशी माहिती दिली.

लवकरच प्रत्येकाच्या घरात नियमित पाणी येणार या आनंदाने अनेक महिलांनी या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना आण्णा व ताई यांचे आभार ही मानले.

शनिवारी झालेल्या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उत्तम कामगिरी करणाऱ्या स्त्रियांना सन्मानित करण्यात आले. विविध खेळातील प्रथम विजेत्यांना प्रत्येकी टिव्ही, डिनर सेट तसेच ट्रॉली बॅग देण्यात आली. सोबतच अनेक विजेत्यांना पैठण्या तर विविध बक्षिसे ही या वेळी महिलांनी प्राप्त केले.

विशेष महिला पुरस्कार सौ.राणी भंडारी व्यवसाय क्षेत्र, सौ गोविंदी विनोद वर्मा व्यवसाय क्षेत्र, लीलाबाई पंडितराव सोनवणे भजनी मंडळ, श्रीमती प्रिया राजपूत शिक्षिका, सौ.पुष्पा मनोज खडांगळे समाजसेवा, सौ सविता चंद्रकांत आव्हाड समाजसेविका, सौ.सुवर्णा बोरसे समाजसेविका, डॉक्टर प्रियांका भंडारी आरोग्य, सौ.सुशीला बारसे सामाजिक उपक्रम, सौ सुनीता नेरकर सामाजिक उपक्रम, संगीता पराशर नर्स गव्हर्मेंट हॉस्पिटल, सौ.डॉक्टर नीलिमा गुजराथी आरोग्य, श्रीमती जयश्री ताई बरडिया सामाजिक क्षेत्र, सौ.राधा नंदकिशोर बागुल साडी डिझायनर, डॉक्टर प्रियंका छाजेड आरोग्य, सौ.भागू गायकवाड समाजसेविका. प्रथम पुरस्कार- सौ दीपिका यश हिरण टीव्ही सेट, द्वितीय पुरस्कार सौ.संगीता राजेंद्र खरे डिनर सेट, तृतीय पुरस्कार सौ श्वेता आशिष ललवाणी ट्रॉली बॅग

लकी ड्रॉ पैठणी विजेते - सौ कार्तिकी परदेशी, सायरा शेख, वंदना जगताप, संगीता खरे, रोहिणी पाटील, श्रद्धा सोपे, मालती गुजराथी, लीना वाघ आजचा कार्यम यशस्वी करण्यासाठी शिवसेना, महीला आघाडी, युवासेना मनमाड शहर पदाधिकारी, शिवसैनिकांनी मेहनत घेतली.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, तुषार प्रकाश गोयल यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव येथे छापून पूनम पब्लिसिटी गोयल बिल्डींग, मनमाड ४२३ १०४, जिल्हा नाशिक येथे प्रसिध्द केले. मो.९४२१५०५१२२ (मनमाडच्या न्यायकक्षेत) संपादक : तुषार प्रकाश गोयल

## ३० डिसेंबर पासून मनमाड क्रिकेट समिती आयोजित आंतरशालेय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा

मनमाड : मनमाड शहरातील माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांमधील असलेल्या क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी मनमाड क्रिकेट समिती आयोजित दि.३० डिसेंबर २०२२ पासून महर्षी वाल्मिकी क्रीडा संकुल, आय.यु.डी.पी.मनमाड येथे आंतरशालेय मनमाड स्तरावर माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या स्पर्धेत सहभागी संघास कोणत्याही प्रकारची फी घेतली जाणार नाही. विनामूल्य प्रवेश असणार आहे.

स्पर्धेतील विजेत्या प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ संघास आकर्षक चषके सनीभाऊ फसाटे यांच्यातर्फे देण्यात येणार आहे. तसेच सर्व सहभागी संघातील प्रत्येक खेळाडूस हबिबभाई शेख व दत्ताभाऊ झाल्टे यांच्यातर्फे टीशर्ट देण्यात येणार आहे. इतर चषके वैभव कापडे यांच्या तर्फे देण्यात येणार आहे. सहभागी सर्व खेळाडूंना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार आहे. सनीभाऊ अरोरा, मनोहर सूर्यवंशी सर, मिथुन धिंगाण, शेखर गवळी, कैलास जाधव, अशोकभाऊ, आकाश चुनियान, शेखर गवळी यांचे सहकार्य लाभणार आहे. आयोजकांतर्फे मनमाड माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी आपल्या शाळेतील क्रिकेट संघ या स्पर्धेत सहभागी करावा व संघातील अकरा खेळाडू व एक अतिरिक्त एकूण १२ खेळाडूंच्या नावाची यादी दि.६|१२|२०२२ पूर्वी बाबा स्पोर्ट्स, छत्रपती शिवाजी महाराज चौक,मनमाड येथे जमा करावे, असे समितीचे अध्यक्ष मनोज ठोंबरे सर व एम.पी.एल.क्रिकेट अध्यक्ष राजेंद्र जाधव, उपाध्यक्ष रहिमभाई पठाण, सचिव जाविद शेख सर, कार्यवाहक देवेंद्र चुनियान यांनी कळविले आहे.

## शिक्षिका सौ.अंजली लहाने यांना देवाज हेल्थ अँड डेव्हलपमेंट फाउंडेशनतर्फे पुरस्कार

मनमाड : के.आर.टी हायस्कूल च्या शिक्षिका सौ. अंजली प्रमोद लहाने यांना शिक्षण क्षेत्रात उत्तम कामगिरी केल्याबद्दल देवाज हेल्थ अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन तर्फे सौ.अंजुम सुहास कांदे यांच्या हस्ते त्यांच्या शिक्षण क्षेत्रात केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल पुरस्कार व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील काम पाहत असताना आपल्या घरची व कुटुंबातील सर्व सदस्यांची सर्व जबाबदारी उत्तम रित्या पार पाडत असतात. त्यांच्या या शिक्षण क्षेत्रातील कामगिरीबद्दल देवाज हेल्थ अँड डेव्हलपमेंट फाउंडेशनने दखल घेतली व सौ.अंजली लहाने यांचा गौरव करण्यात आला. लहाने मॅडम यांच्या सत्कार बद्दल केआरटी हायस्कूलचे प्राचार्य



मुकेश मिसर, मुख्याध्यापक दीपक व्यवहारे, वैभव कुलकर्णी, धनंजय निंभोरकर यांनी अंजली लहाने यांचा सत्कार केला. त्याचप्रमाणे शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## जुन्या घराच्या खरेदीनंतर आपोआप वीज कनेक्शन नव्या मालकाच्या नावावर

# ‘ईज ऑफ लिव्हिंग’साठी महावितरणचा उपक्रम

मुंबई/नाशिक : एखादे जुने घर किंवा दुकान खरेदी केल्यानंतर त्याचे विजेचे कनेक्शन जुन्या मालकाकडून नव्या मालकाच्या नावावर होण्यासाठीची ग्राहकांची धावपळ बंद होऊन आ-पोआप कनेक्शन धारकाच्या नावात बदल होण्यासाठी महावितरणने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन व्यवस्था नुकतीच सुरू केली आहे. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ‘ईज ऑफ लिव्हिंग’च्या सूचनेनुसार हा उपक्रम यशस्वीपणे राबविल्याबद्दल महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

एखाद्याने जुने घर किंवा दुकान खरेदी केले आणि त्यानुसार मुद्रांक शुल्क भरून संबंधित विभागाकडे नोंदणी केली की त्यानंतर त्या घराचे किंवा दुकानाचे विजेचे कनेक्शन जुन्या मालकाकडून आपल्या नावावर होण्यासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागत होता. या बदलासाठी महावितरणकडे अर्ज व सोबत कागदपत्रे दाखल करून प्रक्रिया शुल्क भरल्यानंतर कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून पडताळणी केली जात असे. महावितरणने यासाठी ऑनलाईन सुविधाही उपलब्ध केली आहे. त्यानुसार ऑनलाईन अर्ज भरून संबंधित कागदपत्रे अपलोड करता येतात. परंतु, या प्रक्रियेत कागदपत्रांच्या पडताळणीत वेळ जात होता. ग्राहकांना अनेकदा पाठपुरावा करावा लागत होता.

नव्या व्यवस्थेनुसार मुद्रांक शुल्क व नोंदणी विभागाशी महावितरणची आयटी सिस्टिम जोडली आहे. नोंदणी विभागात नव्या मालकाच्या नावाची प्रक्रिया पूर्ण झाली की, महावितरणला संदेश पाठविला जातो, त्यानुसार महावितरणकडून संबंधित ग्राहकाला एसएमएस पाठविला जातो व आवश्यक प्रक्रिया शुल्क भरण्यास कळविले जाते. हे शुल्क ग्राहक घरात बसून ऑनलाईनही भरू शकतो. फी भरली की विजेचे कनेक्शन नावावर होते आणि पुढच्या महिन्याचे विजेचे बिल नव्या मालकाच्या नावाने पाठविले जाते. एकापेक्षा अधिक व्यक्तींच्या नावे घराची खरेदी झाली असेल तर त्यांच्याशी संपर्क साधून कोणाच्या नावे वीज कनेक्शन ट्रान्स्फर करायचे याची निवड करण्यास सांगितले जाते. कारण विजेचे कनेक्शन एकच व्यक्ती किंवा संस्थेच्या नावे असू शकते. नव्या प्रक्रियेत वीज कनेक्शन नाव-ावर होण्यासाठी स्वतंत्र अर्ज करणे, कागदपत्रे दाखल करणे, पडताळणी करणे व पाठपुरावा करणे हे सर्व कमी झाल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. नवीन व्यवस्थेची चाचणी नुकतीच यशस्वी झाली आहे. विजय सिंघल म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ईज ऑफ लिव्हिंग’चा संदेश आहे. त्यानुसार योजना राबविण्याची सूचना उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. अशा प्रकारे ग्राहकांना वीज कनेक्शन आपोआप बदलून मिळण्यासाठीच्या प्रकल्पाचे काम ऑक्टोबर महिन्यात सुरू झाले. आता हा प्रकल्प पूर्ण झाला असून आता ग्राहकांना या नवीन से-वेचा लाभ घेता येणार आहे.

## जनरल मॅनेजर अनिल कुमार लाहोटी यांची मनमाड कारखाना अतिरिक्त शिष्टमंडळाला भेट



मनमाड : मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर अनिल कुमार लाहोटी हे मनमाड वर्कशॉपच्या दौरांवर आले असता ऑल इंडिया एससी एसटी रेल्वे एम्प्लाईज असोसिएशन कारखाना अतिरिक्त मंडळच्या शिष्टमंडळाने झोनल सचिव सतिश केदारे यांच्या नेतृत्वाखाली भेट घेऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. मनमाड वर्कशॉप मधील कामासंदर्भात निवेदन देण्यात आले.

यावेळी प्रधान मुख्य इंजिनिअर (मुंबई) राजेश अरोरा, सी.ए.ओ.(मुंबई) मनोज कुमार शर्मा, सिनियर डि.ई.एन. (मुंबई) तरूण कुमार दंडोतिया, भुसावळ मंडळाचे रेल्वे प्रबंधक एस.एस.केडिया, कारखाना प्रबंधक मयंक सिंह आदी प्रशासिकीय अधिकारी उपस्थित होते. निवेदनात मनमाड वर्कशॉप कच्च्या मालाचा नियमित पुरवठा करण्यात येवा, मनमाड नाशिक अपडाऊन रेल्वे कर्मचारी वर्गासाठी विशेष पास देण्यात यावा, नवीन कर्मचारी मनमाड वर्कशॉप देण्यात यावे, नवीन वर्क ऑर्डर देण्यात यावी, आदी मागण्यांचा समावेश करण्यात आला होता. यावेळी झोनल कार्यकारिणी सदस्य, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

## गुड शेफर्ड स्कूलमध्ये कायदेविषयक मोफत मार्गदर्शन शिबीर व संविधान वाचन




मनमाड : नांदगाव तालुका विधी सेवा प्राधिकरण समिती व मनमाड संघ यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान सप्ताहचे आयोजन गुड शेफर्ड स्कूल मध्ये करण्यात आले होते.

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे संविधान वाचन व मोफत कायदे विषयक शिबिर दि. २ डिसेबंर २०२२ रोजी आयोजीत करण्यांत आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी संविधानाचे वाचन शाळेची विद्यार्थिनी संचिता पाटीलने केले. कार्यक्रमाचे प्रमुख अध्यक्ष म्हणून मनमाड न्यायालयाचे मुख्य नायाधीश सौ.शलाका लोमटे, प्रशासन अधिकारी सौ.चंद्रमोरे मॅडम, मनमाड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुधाकर मोरे, सरकारी वकील ॲड. गिरीश पवार, ज्येष्ठ वकील ॲड. देसले, व ॲड.अग्रवाल, प्राचार्य डॉ. क्लेमेंट नायडू मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी सर्व शाळांचे मुख्याध्यापक, गुड शेफर्ड शाळेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. देशभक्ति गीतांनी शिबीराचे वातावरण आंनदी व उल्हासित झाले. मनमाड न्यायालयाच्या न्यायधीश सौ.शलाका लोमटे यांनी भारतीय राज्यघटनेचे मार्गदर्शक तत्व व आजच्या काळातील महत्व या विषयावर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. सुधाकर मोरे यांनी केले. आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ.क्लेमेंट नायडू यांनी केले. सूत्रसंचलन गुड शेफर्ड शाळेचे शिक्षक भाऊसाहेब दाभाडे यांनी केले.

## नांदगाव मनमाड सह राज्यातील बाजार समितीच्या निवडणुका औरंगाबाद हायकोर्टाच्या आदेशाने रद्द

नांदगांव (प्रतिनिधी) : राज्यातील बाजार समितीच्या निवडणुका जानेवारी महिन्यात होणार होत्या . त्यासाठी अधिसुचना जारी होवून निवडणूक कार्यक्रम जा–हीर झालेला होता . परंतू श्रीरामपूर येथील दिपक पटारे यांनी औरंगाबाद हायकोर्टात याचीका दाखल केलेली होती. या याचीकेवर निर्णय देतानां जाहीर झालेल्या निवडणुका रद्द करून नव्याने १५ मार्च नंतर निवडणूका घेण्याचा आदेश दिल्याने गाव पातळी वरील पुढारी वर्गाचा हिरमोड झाला असून आता शेतकरी वर्गाला सुद्धा निवडणूका लढवता येणार असल्याने सर्व सामान्य शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे . नांदगाव बाजार समितीच्या व्यापारी गट/ सोसायटीगट / ग्रामपंचायत गटातील मतदान यादीत चुका असल्याने मोठया प्रमाणावर हरकती दाखल झालेल्या होत्या. आता निवडणूका रद्द झाल्याने मार्च महिन्यात पुन्हा नव्याने निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार असल्याने पुन्हा नवीन यादया तयार कराव्या लागणार आहे.

## के.आर.टी शाळेचे सार्थक वाढवणे आणि स्मित मकवाने यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड



मनमाड : मनमाड येथे झालेल्या तालुकास्तरीय बुध्दिबळ स्पर्धा अतिशय उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेत मनमाड येथील कवी रबिंद्रनाथ टागोर इंग्लिश मिडीयम स्कूलच्या १४ वर्षाखालील मुले व १७ वर्षाखालील मुलांच्या गटाने सहभाग घेतला.

या स्पर्धेत सार्थक सुनिल वाढवणे या विदयार्थ्यांने बुध्दिबळात ५ गुणांपैकी साडेचार गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला तर स्मित दिपक मकवाणे या विदयार्थ्यांने ५ पैकी ४ गुण प्राप्त करत चौथा क्रमांक मिळवला. वरील दोन्ही विदयार्थ्यांची जिल्हास्-तरावर निवड झाली. या विदयार्थ्यांना शाळेचे क्रीडाशिक्षक विशाल झाल्टे सर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य मुकेश मिसर, प्राथमिक दिपक व्यवहारे, संस्थेचे वैभव कुलकर्णी, धनंजय निंभोरकर आणि संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच शाळेचे सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

BIS 100% Hall Marked Jewellery
आमच्याकडे कोणतेही BIS प्रमाणित ९१६ हॉलमार्क दागिने मोडताना घट येत नाही.

**कोणत्याही आणि कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका.**

* हॉलमार्क नसलेले दागिने खरेदी करणे नुकसानदायक आहे.
* हॉलमार्क नसलेले दागिने खरेदी केल्यामुळे सोन्याच्या शुध्दतेत फसवणुक होऊ शकते.
* **916 22 K** हॉलमार्क दागिने **KDM2-LOY** पासून बनलेले असतात त्यांना डाग नावाचा प्रकार नसतो.
* फक्त **916 22 K** मार्किंग म्हणजे हॉलमार्क नसतो. त्यावर BIS चा लोगो सुध्दा असला तरच तो दागिना ओरिजनल हॉलमार्क असतो.
* BIS हॉलमार्क दागिने खरेदी करण्याचे फायदे.
* हॉलमार्क असलेले दागिने खरेदी केल्यामुळे सोन्याच्या शुध्दतेत फसवणूक होत नाही.
* भारत सरकार प्रमाणित लॅबमध्ये दागिन्यांची पारख होते व दागिना शुध्द असेल तरच त्याच्यावर हॉलमार्किंग केली जाते.
* BIS **916 22 K** हॉलमार्क दागिने मोडतांना कसलीही डागाची घट कापली जात नाही.
* हॉलमार्क सोन्याच्या दागिन्यांना मजुरी ही प्रती ग्रॅममागे लागते. ती ही कॅरेट च्या योग्य भाव प्रमाणे. आणि तीच आधी समजावून घ्या. शंका असल्यास आम्हाला संपर्क करा.
* २० कॅरेट, २२ कॅरेट हॉलमार्क सोन्याचे भाव आणि २३ कॅरेट, २४ कॅरेटसोन्याचे भाव हे हे वेगवेगळे असतात.
* नवीन हॉलमार्क सक्तीचे कायदे हे ग्राहक हितासाठीच बनलेले आहेत.
* साध्या (estimate, qotation लिहिलेले) पावतीवर व्यवहार केल्यास तुमची फसवणूक अटळ आहे. **GST** चे पक्के बिल मागून घ्या.
* दागिने खरेदी खरेदी केल्यावर **GST** चे पक्के बिल मागून घ्या आणि ते मिळत नसेल तर तेथून दागिने खरेदी करू नका. अन्यथा तुम्ही फसवले जाऊ शकता.
* तुमचे याआधी खरेदी केलेले दागीने सुध्दा योग्य भावाप्रमाणे मोडले जाऊ शकतात ते मोडता येणार नाही. घट जास्त येईल. कमी भाव मिळेल हा अपप्रचार केला जात आहे.
* जुने दागीने हॉलमार्कचे नसतील तरीही त्यांची किंमत कमी होत नाही हे लक्षात ठेवा.
* रोजचे सोने–चांदीचे भाव जाणून घेण्यासाठी आम्हास संपर्क करा.



**कंचन ज्वेलर्स**
४५७, सराफ बाजार, मनमाड

**दिपक गोयल**
सचिव : सराफ सुवर्णकार असो. मनमाड
सरचिटणीस : भाजपा मनमाड शहर
मो.9960931414

दत्त जयंतीच्या शुभमुहुर्तावर मनमाडकर खवय्यांसाठी आम्ही घेऊन येत आहोत...

वातानुकुलीत, संगितमय, चविष्ट, रूचकर आणि लज्जतदार फास्ट फुड पदार्थांची मेजवाणी

YO!!

PURE VEG.

II SHRI II

One Bite Cafe

TASTY FAST FOOD WITH DESI TADKA...

Mob.9028878999

प्रोप्रा.दिपक मकवाणे

साई सिटी सेंटर मॉल

मालेगांव नाका, शॉप नं.१३, मनमाड

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक व मित्र परिवारास
'नाताळ व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

नाताळ-नूतनवर्ष धमाका ऑफर

रु.3000 च्या पुढील खरेदीवर मिळवा मोफत कुपन आणि लकी ड्रॉ द्वारे आकर्षक बक्षिसे जिंकण्याची सुवर्णसंधी...!

सोने-चांदी दागिने खरेदी सोबतच आकर्षक बक्षिसांची लयलुट...

| प्रथम बक्षिस | द्रितीय बक्षिस | तृतीय बक्षिस | चतुर्थ बक्षिस | पाचवे बक्षिस |
|---|---|---|---|---|
| XIAOMI (40inch) ॲनरॉईड LED टि.व्ही. | Vivo (6/128GB) मोबाईल फोन | Whirlpool (190ltr.) फ्रिज | XIAOMI (32 inch) ॲनरॉईड LED टि.व्ही. | LG (7Kg.) वॉशिंग मशिन |

| सहावे बक्षिस | सातवे बक्षिस | आठवे बक्षिस | नववे बक्षिस | दहावे बक्षिस | अकरावे बक्षिस |
|---|---|---|---|---|---|
| Crompton (550w) मिक्सर - ५ नग | Noise (1.69" Display) स्मार्ट वॉच- ५ नग | Cello (18 pcs.) किचन सेट - ५ नग | Boat Rockerz हेडफोन्स - ५ नग | Esquire Palstic टि-टेबल - ५ नग | लगेज ट्रॉली बॅग ५० नग |

मग विचार कसला...यंदा सणानिमित्त संधी आहे...
खरेदीची आणि लकी ड्रॉ द्वारे बक्षिसे जिंकण्याची...

* हॉलमार्क दागिने
* कोणतेही छुपे कर नाही
* पारदर्शक व्यवहार
* योग्य भाव व मजुरी

शुध्दता आणि विश्वासाची वैभवशाली परंपरा

कंचन ज्वेलर्स

सराफ बाजार, मनमाड, मो.९४२१५०५१२२, ९९६०९३१४१४